लोकमत पु. पान क्र. १

# घरांच्या नावावर फसवणूक



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पवईच्या तुंगा गावातील सुंदरनगर येथे राहणाऱ्या फतेहबहादूर यादव (३८) यांची १९ जुलै २०१९ ते ११ ऑक्टोबर २०२३ दरम्यान फसवणूक झाली आहे. पेल्हार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी नरेंद्र राय (४०) याने तुंगारफाटा येथील एक ६० बाय ५० फूट लांबी-रुंदीची जमीन दाखवून या ठिकाणी चाळ वजा घरे बांधून कमी पैशात नवीन घरे देणार असल्याचे त्यांना सांगितले.

## धमकी देऊन घाबरवले

आरोपीने यादव यांच्याकडून एक-एक लाख रुपयांचे दोन चेकद्वारे दोन लाख रुपये व रोख दोन लाख रुपये, असे एकूण ४ लाख रुपये घेतले, मात्र घर, जमीन वा पैसे परत केले नाहीत. उलट त्यांनाच धमकी देऊन घाबरवून त्यांची आर्थिक फसवणूक केलेली आहे.

# जप्त केलेल्या फ्लॅटमध्ये अतिक्रमण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरारोडच्या राज अटलांटिस इमारतीतील २०२ क्रमांकाची सदनिका पंजाब नॅशनल बँक एजन्सीने कर्ज थकबाकी म्हणून न्यायालयाच्या आदेशाने कोर्ट कमिशनरमार्फत २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सील केली होती. १५ मार्च रोजी बँकेचे कर्मचारी फ्लॅटच्या पाहणीसाठी आले असता बँकेने लावलेले सील तोडून लिली मायकल पटेल (वय ४५) या महिलेने अतिक्रमण करून ती रूम ताब्यात घेऊन तेथे राहत असल्याचे आढळून आले.

बँकेचे व्यवस्थापक शंकर दास यांच्या फिर्यादीवरून ८ एप्रिलला मीरा रोड पोलिसांत लिली पटेलविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चिमुकलीवर अत्याचार



**नालासोपारा :** शहरात राहणाऱ्या ४ वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर अत्याचार झाल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली आहे. आरोपीने पीडित मुलीला पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात बोलावून आतून कडी लावून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला आहे. नालासोपारा पोलिसांनी आरोपीविरोधात बलात्कार, पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. नालासोपारा पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# नैराश्यातून आत्महत्या



**नालासोपारा :** वाकणपाड्याच्या रफिक कंपाऊंड येथील अफजल मलिक (२६) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याचे एका मुलीसोबत ४ वर्षांपासून मैत्रीचे संबंध होते. मुलीच्या घरच्यांनी त्याच्यासोबत लग्नास सहमती नसल्याने १ वर्षापूर्वी तिचे दुसऱ्या तरुणासोबत लग्न लावून दिले. तेव्हा अफजल हा निराश झाला होता. तो कोणाशी काहीही बोलत नव्हता. याच नैराश्यातून त्याने सोमवारी मामाच्या दुकानाच्या लोखंडी शटर वरील असलेल्या रॉडला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. पेल्हार पोलिसांनी मंगळवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पेल्हार पोलिस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# नवघर पोलिस ठाण्याजवळून रिक्षा चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरमधील नवघर पोलिस ठाण्याच्या बाजूला प्रभात पाटील मार्गावर उभी केलेली रिक्षा चोरीला गेल्याचे उघड झाले आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर गाव, हनुमान मंदिरासमोर कुणाल कुटीरमध्ये रिक्षाचालक मिलिंद मोहन म्हात्रे (वय ३७) हे राहतात. सायंकाळी रिक्षा काढण्यासाठी म्हात्रे गेले असता, त्यांची रिक्षा चोरीला गेली असल्याचे आढळून आले. याप्रकरणी ८ एप्रिलला नवघर पोलिस ठाण्यात अनोळखी चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार लक्ष्मण पाटील तपास करीत आहेत.

# विद्यार्थ्यावर वस्तऱ्याने वार

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या जेसल पार्क भागातील कृष्णा पार्क इमारतीत गौरव हरेश पासड (वय २०) हा राहतो. विद्यार्थी असून तो शिक्षण घेत आहे. ८ एप्रिलच्या सायंकाळी तो ओस्तवाल दर्शन इमारत जवळून घरी जात असताना शिवा ठाकूर नावाच्या तरुणाने दाढी करण्याच्या वस्तऱ्याने गौरव याच्या डाव्या कानावर वार केला व जखमी केले. तसेच ठोशा बुक्क्यांनी त्याला मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी नवघर पोलिसांनी शिवा ठाकूर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलिस गुन्ह्याचा तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पान क्र. 5

# निष्काळजीपणा ४ कामगारांच्या जिवावर

## तीन दिवसांत कारवाई करा, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ग्लोबल सिटीतील खासगी गृहसंकुलाच्या मलनिस्सारण केंद्र - २ च्या टाकीत सफाईसाठी उतरलेल्या चार कामगारांच्या मृत्यूप्रकरणी अर्नाळा पोलिसांनी पॉलिकॉन इन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. कंपनीचे मालक आणि सुपरवायझरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची दखल घेत तीन दिवसांत कारवाई करा, असे आदेश राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या संचालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

आडणे गावातील नानकरपाडा येथे राहणारे अमोल घाटाळ (वय २८) व निखिल घाटाळ (२४), सागर तांदळेकर (३१) आणि शुभम पारकर (२८) हे चौघेही पॉलिकॉन इन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. पॉल्युशन कंट्रोल प्रोजेक्ट कंपनीमध्ये विरारच्या ग्लोबल सिटीतील मलनिस्सारण केंद्र-२ येथे काम करत होते. कंपनी मालक व प्रकल्पाचे सुपरवायझर महादेव कुपटे (६२) यांनी काळजी न घेता मजुरांना रिसायकल टँकमध्ये चोकअप काढण्यासाठी उतरवले. मात्र सुरक्षेची उपकरणे, व ऑक्सिजनचा पुरेसा पुरवठा नसल्यामुळे कामगारांचा मृत्यू झाला. मनपा आयुक्त अनिलकुमार पवार, उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी घटनास्थळी भेट दिल्यावर या कामगारांना प्रकारच्या सुरक्षेची साधने देण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणात सुपरवायझरला अटक केली.

### '३० लाख नुकसानभरपाई द्या'



ग्लोबल सिटी येथील सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र.

■ मॅनहोलमध्ये काम करणे प्रतिबंधित असतानाही अशा प्रकारच्या घटना अद्यापही घडत असल्याचे दिसत आहे.

■ प्रशासन याबाबतीत योग्य खबरदारी घेत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे जिल्हा मॉनिटरिंग कमिटीचे सदस्य ॲड. सागर रतन चरण यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाला पत्र लिहिले आहे. या प्रकरणातील मृतांच्या कुटुंबीयांना तत्काळ प्रत्येकी ३० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

# 'त्या' मृत कामगारांमध्ये २ सख्ख्या भावांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** मलनिस्सारण केंद्राच्या टाकीत गुदमरून मृत्यू झालेल्या कामगारांमध्ये दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे. अमोल घाटाळ (वय २७) व त्याचा लहान भाऊ निखिल घाटाळ (२४) या तरुण मुलांचा मृत्यू झाल्याने घाटाळ कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात मंगळवारी चार कामगार नियमित साफसफाई करण्यासाठी गेले होते. तो कामगार बराच वेळ झाला तरी परत आला नसल्याने त्याला पाहण्यासाठी दुसरा गेला, दुसऱ्याला पाहण्यासाठी तिसरा अन् तिसऱ्याला पाहण्यासाठी चौथा टाकीत उतरला. मात्र, त्यांचा गुदमरून मृत्यू झाला.



अमोल घाटाळ



निखिल घाटाळ

### आठ दिवसांपूर्वी झाली मुलगी

आठ दिवसांपूर्वी अमोल याला मुलगी झाली. घरात मुलीच्या रुपाने लक्ष्मी आल्याने घाटाळ कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, या दुर्घटनेत त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांसह आडणे गावातील अनेकांना शोक अनावर झाला.

# 'ते' सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र निर्मितीपासूनच वादात

## शाळेतील मुलांकडून दुर्गंधीच्या येत होत्या तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** विरार पश्चिम-ग्लोबल सिटी येथील खासगी सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र निर्मितीपासूनच वादात सापडलेले होते. त्यातच आता चार कामगारांचा मंगळवारी गुदमरून मृत्यू झाल्याने ते पुन्हा चर्चेत आले आहे. या केंद्राशेजारी शाळा असल्याने विद्यार्थ्यांनी दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी केलेल्या होत्या. त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होईल, असा आक्षेप घेत त्याला विरोध करण्यात आलेला होता. मात्र, बांधकाम व्यावसायिकाचीच शाळा असल्याने पालक थेट तक्रार करू शकत नव्हते, अशी माहिती परिसरातील रहिवाशांनी दिली.

विरार पश्चिम-ग्लोबल सिटी येथील २० ते २५ इमारतींकरिता रुस्तमजी या बांधकाम व्यावसायिकाने सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राची निर्मिती केली आहे. या सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रात दीड ते दोन एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

### आर्थिक बचतीच्या प्रयत्नांत चौघांचे बळी

सुरक्षा साधने न घेताच पाण्यात उतरलेल्या या चौघांचा दूषित वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला. या दुर्घटनेप्रकरणी अर्नाळा सागरी पोलिसांनी पॉलिकॉन कंपनीच्या दोघांवर निष्काळजीपणे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कलम ३०४ अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. पॉलिकॉन एजन्सीने मजुरांच्या जीविताची काळजी घेणारी कोणतीही उपाययोजना केलेली नव्हती किंबहुना आर्थिक बचत करण्याच्या प्रयत्नांत या चौघांचे बळी घेतलेले आहेत, असा आरोप केला जात आहे.

■ या सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राच्या देखभाल, साफसफाईची जबाबदारी नालासोपारा स्थित पॉलिकॉन या एजन्सीला देण्यात आलेली आहे. कामाचा अनुभव नसलेल्या एजन्सीने तीन महिन्यांपासूनच याचे देखभाल-दुरुस्तीचे काम हाती घेतले होते.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. ३

# पालिकेत सामील होण्यास २९ गावांतील लोकांचा विरोधच

## शासनाच्या निर्णयाबाबत स्थानिकांमध्ये व्यक्त होतेय नाराजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** २९ गावांच्या बाबतीतील सर्व याचिका मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच फेटाळल्या असून नगरविकास विभागाने २९ गावे मनपात समाविष्ट करण्याबाबत प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले होते. यानंतर १४ फेब्रुवारीला नगरविकास विभागाने हरकती नोंदविण्यासाठी एक परिपत्रक काढले होते. सध्या या परिपत्रकावर हरकती नोंदविण्याची प्रक्रियादेखील सुरू आहे. मात्र, शासनाच्या या निर्णयाबाबत स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून गावे मनपात समाविष्ट करण्यास प्रखर विरोध होत आहे.



आधीच अनेक पातळ्यांवर अपयशी ठरलेल्या मनपाच्या हातात ही गावे गेल्यास गावांचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही, असेच स्थानिकांचे मत आहे. बेसुमार अनधिकृत बांधकामे, मूलभूत सोयी-सुविधांची वानवा, आरक्षित भूखंडांचे रक्षण करण्यात अपयशी ठरलेली मनपा गावांचा विकास करण्यास असमर्थ असल्याचे मत ग्रामस्थ व्यक्त करतात.

### गावांबाबत अभ्यास केला नसल्याचा आक्षेप

- ही २९ गावे मनपाने समाविष्ट करण्याबाबत शासनाने काय अभ्यास केला आहे. तसेच अधिसूचना काढण्यासाठी संबंधित मंत्रालयाने नगरविकास विभागाला दिलेल्या आदेशाची प्रत, गावांचा मनपात समावेश केल्यास स्थानिकांना होणारा फायदा तसेच शासनाचा नेमका कोणता फायदा होणार आहे व स्थानिकांचा विरोध असतानाही गावे मनपात समाविष्ट करण्यासाठी शासन का आग्रही आहे, याबाबतच्या अहवालाची प्रत व इतर संबंधित कागदपत्रांची मागणी माहिती अधिकारात चरण भट यांनी केली होती.
- यावर उत्तर देताना नगरविकास विभागाच्या अवर सचिव निकेता पांडे यांनी कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता न करता कार्यालयीन कार्यपद्धतीनुसार सद्य:स्थितीत कामकाज सुरू असल्याचे कळवले आहे.
- यापकरणी कार्यवाही पूर्ण झाल्यावर माहिती पुरवणे शक्य असल्याचे म्हटले आहे. यावरून नगरविकास विभागाने या २९ गावांबाबत कोणताही अभ्यास केला नसल्याचे उघड होत आहे

# प्लायवूड व्यापाऱ्याची लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अहमदाबादच्या बोप्पल येथील इस्कॉन प्लॅटिनम येथे राहणारे प्लायवूड व्यापारी सौरभ हुररा (४२) यांची ७ एप्रिलला फसवणूक झाली आहे.

आरोपी अरबाज खान आणि समीर या दोघांना ८ बाय ४ चौरस फुटाचा ८८० प्लायवूडचा माल विश्वासाने कृष्णा ट्रान्सपोर्टच्या ट्रकमधून आचोळे रोडवरील ग्लोबल प्लायवूड एजन्सी येथे उतरविण्यास सांगितले; पण दोन्ही आरोपींनी माल न उतरवता दुसऱ्या ठिकाणी बिलालपाडा येथे उतरवून १ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करत विश्वासघात करून पळून गेले. पेल्हार पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

# गॅस भरणाऱ्या दोघांवर गुन्हा

**नालासोपारा :** नायगांवच्या विजय पार्क येथे रमेश सियाक (२०) आणि साईराम रामकिल्लेरी (४७) हे दोघे मंगळवारी दुपारी धोकादायकरित्या एका घरगुती सिलिंडरमधून दुसऱ्या सिलिंडरमध्ये गॅस भरत असताना माणिकपूर पोलिसांना मिळून आले. पोलिस अंमलदार धनंजय चौधरी यांनी माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी अनेक घरगुती सिलिंडर, स्टीलची नळी, असा एकूण १,१२,२०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. 4

# सीसीटीव्ही कॅमेरा रोखणार माती भराव

## ▌चोरून डेब्रिज टाकणाऱ्यांवरील कारवाईसाठी उपाययोजना



▌मीरा रोड : मीरा-भाईंदर शहरात विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला रात्रीच्या वेळी चोरीने ट्रकचालक मोठ्या प्रमाणात माती व कचरा, डेब्रिज भराव टाकतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असून, त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. ट्रकचालक रात्रीच्या वेळेस कचरा टाकत असल्याने त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होत नाही. यामुळे ट्रकचालकांवर कारवाई करण्यासाठी मीरा-भाईंदरच्या हद्दीतील मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

मीरा-भाईंदर शहरात मुंबई व इतर ठिकाणावरून इमारतीचे निघालेले डेब्रिज, माती, कचरा रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला व कांदळवनात आणून टाकला जातो. शहराची स्वच्छता बिघडवणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने गेल्या वर्षी पथक नेमले होते. परंतु या पथकाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने हे पथक बंद करण्यात आले आहे. मुंबईतून येणारे मातीने भरलेले ट्रक दहिसर चेकनाका येथे अडवून त्यांची तपासणी होणे आवश्यक आहे. परंतु पोलीस व महापालिका याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे शहरात माती भरावाचे प्रमाण वाढले आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय मार्गावरील दहिसर चेकनाक्यापासून ते पुढे घोडबंदर पुलापर्यंत मीरा-भाईंदर महापालिकेची हद्द आहे. या महामार्गांच्या कडेला मोठ्या प्रमाणात बाहेरील माती, डेब्रिज व कचरा आणून टाकला जात आहे. त्यामुळे येथून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच रात्रीच्या अंधारात टाकलेली माती दिसत नसल्यामुळे वाहनचालकांचे अपघात होत असल्याचे दिसून येते.

रस्त्याच्या बाजूला माती व कचरा टाकल्यामुळे शहरात येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना तो परिसर अस्वच्छ व खराब दिसत आहे. महामार्गावर रात्रीच्या सुमारास छुप्या मार्गाने कचरा आणून टाकत असल्याने महामार्गालगत कचऱ्याचे ढिगारे तयार होऊन कचराभूमी तयार झाल्याचे दिसत आहे. अनेकदा तक्रारी करूनदेखील याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

**रात्री भराव करण्यासाठी येणाऱ्या वाहनांची माहिती मिळवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करता येणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. लवकरात लवकर महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश विभागप्रमुखांना दिले आहेत, अशी माहिती पालिका अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर यांनी दिली आहे.**

पुढारी पान क्र. 3

## गाईची कत्तल करणारा आरोपी अटकेत

**मिरारोड :** काशीमीरा येथे गायीची कत्तल करताना आरोपीस अटक करण्यात आली आहे. परिसरातील मीनाक्षी नगर येथील डोंगराजवळ बुधवारी पहाटे एका गायीची कत्तल करताना आरोपीला स्थानिक नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काशीमीरा येथे मीनाक्षी नगर परिसरात राहणारा आरोपी नईम सैफ कुरेशी (३३) हा मध्यरात्री टेम्पोमधून गाय घेऊन जाताना तेथील रहिवाशांना दिसला. त्यानंतर दोन रहिवाशांनी त्याच्यावर पाळत ठेवून पहाटे गायीची कत्तल करणार असल्याची माहिती त्या रहिवाशांना मिळाली होती.

त्यांनी पोलिसांना कळवताच पोलीस त्या ठिकाणी हजर होताच गाईचे मांस, कातडे रक्त सांडलेले पोलिसांना आढळून आले. त्या ठिकाणी असलेल्या तीन आरोपींपैकी दोघे अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले, तर एका आरोपीला पोलिसांनी तत्काळ अटक केली. त्यानंतर पळून गेलेल्या इतर दोन आरोपींना देखील अटक केले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपी कुरेशी विरोधात यापूर्वी देखील गोमांस कत्तल प्रकरणी काशीमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र. १

# फसवणुकीची रक्कम सायबर पोलिसांकडून परत


## ▮ ऑनलाइन गुंतवणुकीचे आमिष दाखवले

**। मीरा रोड** : वालीव पोलीस ठाणे हद्दीतील व्यक्तीला इन्व्हेस्टमेंट ॲपमध्ये ऑनलाइन गुंतवणूक करण्यास सांगून ११ लाख १४,२५० रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. सायबर पोलिसांनी तपास करून तक्रारदाराला फसवणूक झालेली पूर्ण रक्कम परत मिळवून दिली. तक्रारदार गुप्ता यांनी टेलिग्राम ॲपवर इन्व्हेस्टमेंट ॲपमध्ये गुंतवणूक करून दुप्पट रक्कम मिळत असल्याची जाहिरात पाहून ॲपमध्ये पैसे गुंतवणूक केली.

जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे तक्रारदाराने एकूण ११ लाख १४,२५० रुपये भरले. त्यांनी गुंतवणूक केलेल्या रकमेचा कोणताही परतावा परत मिळाला नाही. त्यामुळे त्यांची फसवणूक झाल्याची तक्रार सायबर पोलीस ठाणे, मीरा रोड येथे केली होती. तक्रारदाराचा तक्रारी अर्ज मिळताच झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती घेण्यात आली. तक्रारी अर्जाचे, तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित बँकेसोबत वेळोवेळी पत्रव्यवहार करून तक्रारदाराची रक्कम वेळीच संशयित बँक खात्यांमध्ये गोठवण्यात आली. नंतर रक्कम त्यांच्या मूळ खात्यात जमा होण्यासाठी न्यायालयात वेळोवेळी पाठपुरावा केला. तक्रारदाराचे ११ लाख १४,२५० रुपये न्यायालयाच्या आदेशाने फसवणूक झालेली रक्कम सायबर पोलिसांनी परत मिळवून दिली आहे.



# वसईत भिंत कोसळून एकाचा मृत्यू



**। नालासोपारा** : वसई पूर्वच्या पोमण गावातील साष्टीकर पाडा येथे बेकायदा गोदामाचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून एका कामगाराचा मृत्यू, तर एक जण जखमी झाला आहे. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मंगळवारी घडली. आकाश टिकोरीलाल गौतम (२१) असे मृताचे तर त्याचा चुलत भाऊ भसियानंद गौतम असे जखमीचे नाव आहे.

यावेळी ११ मजूर काम करत होते. अचानक गोदामाची भिंत कोसळली. दुर्घटनेत दोन कामगार ढिगाऱ्याखाली कोसळले. त्यात आकाश टिकोरीलाल गौतम याचा मृत्यू, तर त्याचा चुलतभाऊ भसियानंद गौतम हा जखमी झाला आहे. जखमीला सातिवली येथील खासगी रुग्णालयात दाखल केले आहे.

ठेकेदाराने कामगारांना कुठल्याही सुरक्षेची साधने पुरवली नव्हती. त्यामुळे ठेकेदारावर नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बांधकाम बेकायदा असून, त्याची शहानिशा करण्यासाठी ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसीलदारांकडे तक्रार करण्यात आली आहे.

CS CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. १

# वीज चोरांच्या विरोधात धडक कारवाई

## ८० जणांच्या विरोधात गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** वसई, विरार शहरात छुप्या मार्गाने वीजचोरी करण्याचे प्रकार वाढले आहेत. या वीजचोरांना आळा घालण्यासाठी महावितरणने धडक कारवाईची मोहीम सुरू केली. नालासोपारा पोलीस ठाण्यात ८० जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वसई मंडळाच्या अंतर्गत वसई विरारमध्ये वीज ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र काहीजण मीटरमध्ये फेरफार करून, आकडे टाकून छुप्या मार्गाने वीजचोरी करतात याचा फटका महावितरणला बसत आहे. वीज चोरीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. महावितरणने नवजीवन, शांती नगर, गांगडेपाडा, धानिवबाग, जाधवपाडा, गावदेवी, वाकणपाडा, पेल्हार येथे कारवाई केली होती. मात्र त्यानंतर देयकांची रक्कम भरण्यास सांगण्यात आले होते. परंतु वीज ग्राहक पुढे न आल्याने ९ लाख २३ हजार ४८० रुपये किंमतीची ४३ हजार ९७३ युनिटचे नुकसान झाले आहे. महावितरणचे सचिन येतगुडे (३८) यांनी तक्रार देत ८० जणांवर नालासोपारा पोलीस ठाण्यात चार गुन्हे दाखल केले आहे.

### वीजचोरीच्या घटना

**नालासोपारा पूर्वेकडील संतोष भवन, गावराई पाडा, वालईपाडा, मोरेंगाव, नागिनदास पाडा, आचोळे डोंगरी विरार पूर्वेकडे कातकरी पाडा, चंदनसार, मनवेलपाडा, कारगिल नगर वसई पूर्वेकडे भोयदापाडा, नवजीवन, सातीवली, वालीव तर नायगांव पूर्वेकडील जुचंद्र सोमेश्वर नगर, वाकीपाडा या विभागात होते. या विभागात अनधिकृत बांधकामे मोठ्या जोमाने सुरु असल्यामुळे आणि वीजचोरीचे प्रमाण अधिक आहे. संध्याकाळ झाली की विजेच्या खांबावर आकडे टाकून वीजचोरी केली जाते.**

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र 4

# वसई-विरारच्या खाडीकिनारी वाळू माफिया सक्रिय

## भरारी पथकाची कारवाई; चार बोटी नष्ट


**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरारच्या किनारपट्टीवर पुन्हा वाळू माफिया सक्रिय झाले आहेत. मंगळवारी जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि भरारी पथकाने संयुक्त कारवाई करून विरारजवळील काशिदकोपर येथे अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या एकूण चार बोटी जप्त केल्या. नंतर या बोटी आणि सक्शन पंप जिलेटिनच्या साहाय्याने नष्ट करण्यात आल्या.

वसई-विरारचा बहुतांश भाग हा किनारपट्टीचा परिसर आहे. विरारजवळील भागात वैतरणा व शिरगाव, नारिंगी खाड्यांमध्ये छुप्या मार्गाने सक्शन पंप लावून वाळू उपसा होत असतो. या भागात वाळू माफिया पुन्हा सक्रिय झाले आहेत. मंगळवारी खनिकर्म अधिकारी व मंडळ अधिकारी काशिदकोपर, तलाठी, भरारी पथकाने छापा घातला.

कारवाईची कुणकुण लागताच वाळू माफिया फरार झाले. मात्र पथकाने अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या चार बोटी जप्त केल्या. या बोटी आणि वाळू उत्खनन करण्यासाठी वापरला जाणारा सक्शन पंप जिलेटिनच्या साहाय्याने स्फोट करून नष्ट करण्यात आल्या.

भरारी पथकातील जिल्हा खनिकर्म अधिकारी संदीप पाटील, अधिकार शुल्क निरीक्षक मारोती सुर्यवंशी मंडळ अधिकारी सुशांत ठाकरे, विलास पाटील, अनिकेत काळेल आदींच्या पथकाने ही कारवाई केली.



### कांदळवनाला धोका

किनारपट्टीलगत व खाडीकिनारी मोठ्या प्रमाणात कांदळवन आहे. यामुळे किनाऱ्यावरील जैवविविधता व पर्यावरण संतुलन होण्यास मदत होते. मात्र मागील काही वर्षांपासून या किनारपट्टीलगत मोठ्या प्रमाणात बेकायदा वाळू उपसा केला जाऊ लागला आहे. याचा मोठा परिणाम कांदळवनावर होत आहे. विरारजवळील वैतरणा खाडीत मागील काही वर्षांपासून छुप्या मार्गाने बेकायदा वाळू उत्खनन केले जाते. याचा परिणाम हा खाडीत व खाडीकिनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रावर होऊ लागला आहे. सक्शन पंप लावून हे उत्खनन होत असल्याने हळूहळू खाडीजवळील भाग खचू लागला आहे.

CamScanner

# टॅटू काढून टाकण्याचे आदेश

भुवनेश्वर : विशेष सुरक्षा बटालियन (एसएसबी)कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शरीरावरील टॅटू १५ दिवसांच्या आत काढून टाकावे, असे ओडिशा पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. भुवनेश्वरचे पोलिस उपायुक्त (सुरक्षा) यांनी मंगळवारी याबाबतचे आदेश दिले.

शरीरावर असे टॅटू दिसणाऱ्या बटालियनमधील कर्मचाऱ्यांची यादी तयार करावी असे सांगण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान, राजभवन, राज्य सचिवालय, ओडिशा विधानभवन, उच्च न्यायालय या महत्त्वाच्या ठिकाणी विशेष सुरक्षा बटालियनचे कर्मचारी सुरक्षा पुरवितात, तसेच ओडिशामध्ये येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, देशभरातून येणारे मान्यवर यांच्या सुरक्षेसाठी हे जवान तैनात असतात.

CamScanner

# 567kg adulterated mawa seized from luxury bus in Kashimira

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police seized more than 567kg of adulterated mawa (a dairy product used for preparing a variety of sweets) from a private luxury bus in Kashigaon on Tuesday.

The seizure is yet another instance exposing the illegal ferrying of edible ingredients into the city by private public transport operators from adjoining states. The bus, about to enter Mumbai from Gujarat, was intercepted by a team led by senior police inspector Rahul Patil at the entry point of the flyoverbride (FOB) on the highway near Laxmi Baug in Kashimira. Upon inspection, the team found 20 unbranded gunny sacks stashed with loose mawa in the vehicle's luggage space.

Upon recovery, the police immediately contacted officials from the Food and Drugs Administration's (FDA) Thane unit. A team comprising Assistant Commissioner Dhanashree Dahane, Food Safety Officer (FSO) Manek Jadhav and Bharat Vesave reached the spot and collected samples of the mawa for lab tests.

The remaining consignment was destroyed by the police team. The use of substandard products peaks during the festival season. However, the demand for sweets and other food ingredients grows considerably before elections. The Kashigaon police have increased patrolling in the region due to the upcoming general elections.

"Prima facie it appears that the mawa is adulterated as it was packed in unlabelled bags without any details about its manufacturing date and expiry status. However, we are awaiting lab test reports, following which appropriate action will be taken against the supplier and the potential buyers," said Vesave.

THE FREE PRESS JOURNAL Thu, 11 April 2024
https://epaper.freepress

CamScanner